





।। श्री गंगा माता ।।

# स्वागत कन्यागत पर्वाचे



।। श्री कृष्णावेणी माता ।।

डॉ. दिनेश दामाजी फडणीस

द्वादश वर्षे काळ क्रमूनि
'गंगा' येतसे 'कन्या' होऊनि
पूजन करण्या गुरुचरणांचे
ग्रामी येते मुग्ध मोहुनि ।।१।।

पुष्पे रेखिली पालखी मार्गी
मांडव शोभे अनुपम दारी
भक्तिभावे सज्ज होऊनि
घेती निरांजन हाती नारी ।।२।।

अपूर्व संचित गुरुभक्तांचे
नेत्र निवती पाहुनी मूर्ती
दर्शन होता गुरुचरणांचे
भक्तिरसाची अखंड पूर्ति ।।३।।

हर्षोल्हासही चहुकडे अन्
आप्तेष्टांची लगबग न्यारी
गुरुमूर्तीचे दर्शन घेण्या
सज्ज जाहली वसुधा सारी ।।४।।

वाडीग्राम ही पावन भूमी
अष्टही तीर्थे पावन असती
विशेष आहे शुक्लतीर्थ परि
योगीराजही सदैव वसती ।।५।।

शतजन्मीची ही पुण्याई
वसतो आम्ही वाडीग्रामी
स्नान करुया पर्वकाली अन्
तल्लीन होऊ सद्गुरुनामी ।।६।।



।। श्री गंगा माता।।

# स्वागत कन्यागत पर्वाचे



।। श्री कृष्णावेणी माता।।

## कै. गोपाळ विष्णू काकतकर तथा गणा काकतकर

भगवान श्रीदत्तात्रेय सर्व जगाला व्यापून उरले आहेत. नृसिंहवाडी - औदुंबर - गाणगापूर येथे श्रीनृसिंहसरस्वती या नावाने ते प्रसिध्द आहेत, तर पीठापूर, कुरवपूर येथे श्रीपादश्रीवल्लभ या नावाने त्यांचे वास्तव्य आहे. सर्वव्यापी असले तरी ते वाडीमध्येच आहेत, असे आम्ही वाडीकर मोठ्या अभिमानाने सर्वांना सांगत असतो. याचे प्रत्यंतर आम्हाला तर आहेच, परंतु दु:ख आणि कष्टाने गांजलेल्या, सगळीकडे फिरून शेवटी वाडीमध्ये महाराजांना शरण आलेल्या अनेक भक्तांचा हाच अनुभव आहे. आधी - व्याधी - उपाधींच्या कटकटीतून मुक्त झालेले सर्व भक्त म्हणतात, 'दत्तमहाराज वाडीमध्येच आहेत.' आमचा अभिमान दुणावतो. मी आज सत्तर वर्षाचा आहे. पहिली २५ वर्षे बाळपण आणि तारुण्यात गेली. त्यावेळी फारसे ज्ञान नव्हते. पण गेल्या पंचेचाळीस वर्षांचा अनुभव अलौकिक आहे. म्हणून सगळ्या जगाला मी ठासून सांगतो की 'दत्तमहाराज वाडीमध्येच आहेत.' याचे कारण काय? जसे एखादा चार मुलांचा बाप आपल्या पितृभक्त मुलाकडेच कायमचे वास्तव्य करतो, त्याच्यावर सतत मायेची पाखर घालतो, पूर्ण लक्ष देतो. अगदी तोच प्रकार इथे आहे. साडेपाचशे वर्षांपूर्वी श्रीदत्तमहाराज श्रीनृसिंहसरस्वती स्वामीमहाराजांच्या रूपाने कृष्णा - पंचगंगा संगमावरच्या या नितांतरम्य स्थळी वास्तव्यास आले. बारा वर्षे इथे राहिले. पुढे गाणगापूरला जाण्यापूर्वी मनोहर पादुका प्रकटविल्या. 'आम्ही गाणगापूरला जरी जात असलो तरी या पादुकांच्या रूपाने वाडीमध्ये आमचे वास्तव्य अखंड राहील.' अशी ग्वाही दिली. या पादुकांची नित्य त्रिकाळपूजा करण्यासाठी आलासचे भैरंभट जेरे या प्रत्यक्ष वेदमूर्ती असलेल्या ८० वर्षे वयाच्या ब्राह्मणास अनुग्रहपूर्वक सांगितले. ही पूजा वंशपरंपरेने सूर्यचंद्र असे पर्यंत करावी असे सांगितले. भैरभटांना आनंद वाटला, आश्र्चर्य वाटले आणि थोडा खेदही झाला. त्यांची पत्नीसुध्दा वृध्द झाली होती. नि:संतान होती. प्रत्यक्ष चंद्रमौळीची पूजा करण्याचे आपणास भाग्य लाभले याचा आनंद होता. पण पुढे काय? महाराजांनी व्यथा जाणली. "पुत्रवती भव!" असा आशीर्वाद देऊन ओटीत नारळ घातला. "तुम्हाला एक उत्तम पुत्र होईल. त्याला चार पुत्र होतील. या चारही पुत्रांचा वंश औदुंबर वृक्षावरील फळाप्रमाणे वाढेल." असा आशीर्वाद दिला. महाराजांची कृपा झाली. भैरंभटाच्या या चार पौत्रांचे चार फाडे झाले. दरवर्षी एक याप्रमाणे फाडा बदलून मनोहर पादुकांचे त्रिकाळ पूजन अर्चन सुरु झाले. आजमितीला श्रीक्षेत्र नृसिंहवाडीमध्ये सुमारे दीडशे घरे या पुजारी मंडळींची आहेत. भैरंभटांचे हे सर्व वंशज म्हणजे महाराजांची लाडकी लेकरे आहेत. श्रींच्या पादुकांची नित्यपूजा अर्चा, नैमित्तिक सणसमारंभ, उत्सव आणि धर्मपरंपरांचे पालन महाराजांची ही लेकरे कसोशीने, जाणीवपूर्वक जबाबदारीने करतात. त्यामध्ये कानामात्रेचाही फरक नाही. पुजारीमंडळींच्या या अर्चन भक्तीवर महाराज प्रसन्न आहेत. चोवीस तास ते अर्चकांच्या रक्षणासाठी जागे

आहेत. पुजाऱ्यांच्या केसालाही कोणी धक्का लावला तरी ते ताबडतोब त्याचे पारिपत्य करतात. याचा अनुभव अनेकदा आला आहे. त्यामुळे सर्व सुष्ट दुष्ट लोक महाराजांपुढे नम्र असतात.

वाडीच्या दत्तमंदिरातील नित्य कार्यक्रमाशी पुजारी मंडळींची जीवनशैली निगडित आहे. ब्राह्ममुहूर्तावर "दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा" हे भजन म्हणत पहाटफेरी निघते. सगळे गाव या मंगलधुनीने जागे होते. या ग्रामप्रदक्षिणेमध्ये पुजारी आणि इतर भक्तही सामील असतात. अवघा परिसर मंत्रावून जातो. ज्यांची आज पूजेची पाळी आहे ते हक्कदार पुजारी या आधीच घाटावर येतात. स्नानसंध्या आटोपून शुचिर्भूत होतात. नारायण स्वामी महाराज आणि स्वारीचे पूजन करून मुख्य मंडपात येतात. तेथे पूर्वाभिमुख द्वाराशी दत्तभक्तांची दाटी झालेली असते. 'उठि उठि बा दत्तात्रेया। भानू करु पाहे उदया' अशा भूपाळ्या चालू असतात. आचमन संकल्प करुन गणेश पूजन होते. मंडपातील घंटेचा एक टोल वाजतो. मुख्य गाभाऱ्याचे वामनद्वार उघडण्याआधी तीन टाळ्या वाजवतात. अन द्वार उघडले जाते. "प्रभोऽ सरकारऽ कैलासते गिरिजाशंकर, कर्पूरगौर महाराज' अशी वत्सल हाक सर्वांच्याच मुखातून बाहेर पडते आणि "भक्तवत्सल भक्ताभिमानी राजाधिराज दत्तराज महाराज" असे म्हणत देवाचे पहिले दर्शन होते. यानंतर काकड आरती होते. क्षमस्वापराधं म्हणून झाल्यावर पादुकावरील फुले वस्त्रे अलगदपणे बाजूला काढल्यानंतर 'काषायवस्त्रं करदंडधारिणम्' हा श्लोक म्हणून ध्यान केले जाते. यानंतर श्रींच्या पादुकावर श्रीकृष्णेचे पवित्र जल अर्पण करण्यात येते. खूप पुजारी पहाटेच कृष्णास्नान करून ओलेत्याने पादुकेवर पाणी घालून कृतकृत्य होतात. 'चिंतामणि' असे वर्णन असलेल्या या गुरु पादुकांना स्पर्श करण्याचे भाग्य हे फक्त पुजाऱ्यांचेच. 'दत्तात्रेया तवशरणम्' हे गुरुभक्तांनी रचलेले पद समस्त भक्तजन म्हणत असतात. जलाभिषेक पूर्ण होतो. रुद्र, पुरुषसूक्त, श्रीसूक्त अशा सूक्तांचे पठण होते. भगव्या छाटीने पादुका कोरड्या केल्या जातात. गंधलेपन होऊन अष्टगंध तुळशी, फुले यांचा साज पादुकावर चढतो. या मनोहर पादुकांचे पुन्हा एकदा भक्तांना दर्शन होतो आणि पादुकावर लाल किनखापी सात पानांचे वस्त्र घालण्यात येते. त्यावर गंधाच्या तीन रेखांनी मंडित चकचकीत मोठी नागप्रतिमा ठेवतात. समोर दोन पितळी पादुका ठेवून चांदीच्या दोन छोट्या समया ठेवतात. नैवेद्य दाखवताना पडदा सोडला जातो. निखाऱ्यावर धूप करून पडदा वर उचलला जातो. पुन्हा एकदा 'श्रीगुरुदेवदत्त' अशी भक्तजनांची गर्जना होते. आता पुजारी सनकादिकांची पूजा करायला मंडपाबाहेर पडतात. पूजा साहित्य घेतलेला एक शागीर्द हर हर महादेव म्हणत पुढे असतो. श्री रामचंद्रयोगी, श्री नारायणस्वामी, श्री गोपाळस्वामी, श्री काशीकरस्वामी, श्री मौनी स्वामी, श्री विठोबा पंचायतन, श्री ब्रह्मानंद स्वामी, श्री टेंबेस्वामी, श्री कृष्णावेणी माता, श्री सांब, श्रीरामसीतेसह, श्री अन्नपूर्णा, जान्हवी, गणपती या क्रमाने सनकादिकांचे पूजन करुन तीर्थ अंगारा होतो. प्रभात पूजा संपन्न होते.

यानंतर सकाळी ८ वाजल्यापासून दुपारी बारापर्यंत श्रींचे पुजारी भक्त लोकांच्या इच्छेप्रमाणे पंचामृत, एकादशनी, लघुरुद्र इ. पूजाविधी यथाशक्ती करितात. याआधी मंडप स्वच्छ धुऊन कोरडा केला जातो.

मध्यान्हीच्या श्रींच्या पादुकांच्या महापूजेचा महन्मंगल सोहळा घडतो. तो पाहण्यासाठी पुर्वद्वार, दक्षिणद्वार उत्तर द्वारात भक्तजनांची दाटी होते. स्नान संध्या आणि भस्मविलेपन केलेले हक्कदार पुजारी आपले धोतर गुडघ्यापर्यंत खेचून घेतात. पांढऱ्याशुभ्र उपरण्याने नाक, तोंड झाकून फक्त डोळे तेवढे उघडे ठेवतात. वामनद्वारातून अतिशय काळजीपूर्वक आत जातात. पादुकांना डावा हात, किंवा पाय लागणार नाही, इतकेच नव्हे तर आपला श्वासदेखील पादुकेवर जाणार नाही याची दक्षता घेतात. पादुकांची षोडषोपचार महापूजा होते. गंधलेपन होऊन, नानाविध फुले घालून छाट्यांनी आणि किनखापी वस्त्रांनी पादुका झाकल्या जातात. महापूजेनंतर दुपारी दोन ते चार हा काल श्रींच्या मंदिर परिसरात जरा निवांतपणाचा असतो. भक्तजन प्रदक्षिणा घालत असतात आणि याच वेळी मंडपामध्ये काही पुजारी मंडळी





पवमान पंचसूक्ताचा पाठ म्हणज असतात. यानंतर दिवस कलताना दिनविशेष असेल तसे काही भक्तमंडळी भजन, कीर्तन प्रवचन असे कार्यक्रम करतात. सायंकाळी ७ वा. पुन्हा पाळीदार पुजारी स्नानसंध्या करून शुचिर्भूत होऊन सोवळ्याने सायंपूजेसाठी मंडपात येतात. सायंकाळी सनकादिक नारायणस्वामींच्या मंदिरात सांजदीप लावले जातात. श्रींच्या गाभाऱ्यातले नऊ दीप मंदपणे प्रकाशू लागतात. नारायणस्वामींच्या मंदिरातील श्रींची स्वारी चौरंगावर घेतली जाते. किरीट कुंडले, सुवर्णहार, मोतीपोवळे रुद्राक्षाच्या माळा, भरजरी वस्त्रे यांनी उत्सव मूर्तीचा पोशाख होतो. इकडे मंडपामध्ये त्याचवेळी पाळीदार पुजारी पंचोपचार पूजा करतात. अष्टसुगंधित धुपाच्या वासाने परिसर गंधमय होतो. घंटा, झांजा, सनई चौघडे, नगारा कर्णा वाजू लागतात. धुपारती चालू असताना 'पार्वतीपते हर हर महादेव! श्री गुरुदेवदत्त!' अशी गर्जना भक्तजन करतात. तोपर्यंत स्वारीचा पोशाख झालेला असतो. वाडीच्या पुजाऱ्यांचा सर्वात कौतुकाचा विषय म्हणजे दत्तमहाराजांची ही स्वारी! घरी बाळ जन्मले तर कुंची टोपडे आधी स्वारीला. लग्नमुंजीसारख्या मंगलकार्यात आधी महावस्त्र स्वारीसाठी घेतात. प्रत्येक प्रसंगी पादुकांची महापूजा आणि स्वारीला महावस्त्र. अशी ही त्रिभुवनश्रीमंतांची स्वारी सजवून झाल्यावर 'भक्तवत्सल भक्ताभिमानी राजाधिराज श्री सद्‌गुरुराज दत्तराज महाराज!' अशा उत्तुंग ललकाऱ्या देत मंडपात येते. शेवटच्या आरतीनंतर स्वारी पालखीत घेतात. जरतारी गोंड्याच्या रंगीत पालखी सोबत अबदागिरी, मोर्चेळ, चवऱ्या, दिवटी, चांदीच्या काठ्या घेऊन पुजारी मंडळी शाही इतमामाने पालखी सोहळा करतात. तीन प्रदक्षिणेच्या दरम्यान चारी दिशांच्या टप्प्यावर पालखी थांबते. अष्टके, करुणात्रिपदी, भक्तिगीते, अभंग यांच्या जणू मैफिलीच या प्रत्येक टप्प्यावर झडतात. हा सुंदर सोहळा पाहण्यासाठी सुस्वरांच्या विमानांची आकाशात दाटी झालेली असते. सर्व तीर्थांचे पुण्य तिथे एकवटून हात जोडून पुढे उभे राहते. पालखीनंतर मंडपामध्ये देवे, तीर्थमंत्र होऊन, 'घोरात्कष्टात' ही सर्व संकट निवारणाची लोकमांगल्य वाढविणारी प्रार्थना होते. स्वारी पुनः त्याच रुबाबात नारायण स्वामीमंदिरात येते. मंडपामध्ये वैदिक मंडळी श्रींना वेदातील ऋचा ऐकवतात. विडा, शेजारती, अपराध क्षमा झाल्यावर गाभाऱ्याचे दार बंद होते. दत्तमहाराजांचे लाडके पुजारी दिवसभराचा असा महन्मंगल सोहळा नित्य करतात. तीच या वाडीक्षेत्राची खरी ओळख आहे.

चैत्र शु. प्रतिपदेच्या पंचांगश्रवणाने नव्या संवत्सराची सुरुवात होते. चैत्र शु.।। पंचमी ते द्वादशी या काळात रुद्र आणि पवमानाचे अहोरात्र अनुष्ठान चालते. चैत्र, वैशाख,श्रावण आणि अधिक मासात पुजारी मंडळी दररोज सकाळी रुद्र एकादशी करुन अभिषेक करतात. चैत्र, कृष्ण पंचमीला सगळा परिसर सकाळीच पाण्याने धुऊन काढतात. त्याला संप्रोक्षण विधी म्हणतात. योगीराज रामचंद्र योगी यांच्या संजीवन समाधीचा उत्सव असतो. "नारायणं त्वां शरणं प्रपद्ये" हे अष्टक मोठ्या आर्त भावाने म्हटले जाते. ज्येष्ठ कृष्ण नवमी ते अमावस्येपर्यंत पुजाऱ्यांचे लाडके यतिसम्राट प.प. वासुदेवानंद सरस्वती टेंबे स्वामी महाराज यांच्या पुण्यतिथीचा उत्सव असतो. आषाढ शु.प्रतिपदेला हजारो लोकांना त्यांच्या आराधनेचा प्रसाद मिळतो. आषाढ पौर्णिमा म्हणजे गुरुपौर्णिमा! भाविकांची खूप दाटी होते. या दिवसापासून पालखी सोहळा बंद होतो. श्रावण शु.पंचमीला श्री टेंबे स्वामीमहाराजांची जयंती आणि पुजारी मंडळींची ऋक्श्रावणी असते. नवे यज्ञोपवीत धारण करतात. भाद्रपद शु. चतुर्थीच्या दिवशी श्रीपादश्रीवल्लभांची जयंती आणि गणेशउत्सव आरंभ होतो. शुध्द नवमीपासून चतुर्दशीपर्यंत भागवत सप्ताह असतो. अश्विन शु.।। प्रतिपदेपासून विजयादशमीपर्यंत नवरात्र उत्सव. रोज पहाटे मांगलिकस्नान, महापूजा असते. विजयादशमीला स्वारी पालखीत बसून संगमावर सीमोल्लंघनासाठी जाते. तो सोहळा अवर्णनीय असतो. यानंतर दैनंदिन पालखी सुरु होते. अश्विन व. द्वादशी म्हणजे गुरुद्वादशी. श्रीपादश्रीवल्लभ निजानंदी मग्न होऊन गंगेत अदृष्य झाल्याचा पुण्य दिवस. याच दिवशी श्री नृसिंह सरस्वती स्वामीमहाराज नृसिंहवाडीहून गाणगापूरला गेले. चौदा हक्कदार पुजारी

या दिवशी सर्वांना महाराजांचा भोजन प्रसाद देतात. तांदूळ व नारळही देतात. दीपावलीच्या पहाटे मांगलिक स्नान होऊन महापूजा होते. आध्यात्मिक रुपकावर आधारित 'नहाणी' हे पद पुढे सात दिवस म्हणतात. कार्तिक शुध्द द्वादशीला देवालय परिसरात मोठ्या थाटामाटाने तुलसीविवाह होतो. त्रिपुरी पौर्णिमेला घाट पाजळतात. मार्गशीर्ष पौर्णिमेला दत्तजयंतीचा मोठा उत्सव होतो. मार्गशीर्ष कृ. एकादशी ते पौष शु. द्वितीया म्हणजे श्री नृसिंहसरस्वती स्वामी महाराजांचा जयंती उत्सव. सात दिवस कीर्तन, प्रवचन, भजन, लघुरुद्र होत असतात. भोजनप्रसाद असतो. पौष अमावास्या म्हणजे विशाळी अमावास्या. पुजाऱ्यांच्या एका फड्याचा (वंशाचा) सेवा काळ संपतो. माघ शु. सप्तमीपासून पुढे दहा दिवस कृष्णावेणी मातेचा उत्सव सुरु होतो. कीर्तन, पुराण, प्रवचने, संगीत यांची मेजवानीच असते. श्री नृसिंहसरस्वती स्वामी महाराज माघ वद्र प्रतिपदेला श्रीशैल्य येथे कर्दळीवनात गुप्त झाले. ही तिथी म्हणजे गुरुप्रतिपदा. माघ पौर्णिमेपासून वद्य पंचमीपर्यंत अहोरात्र उत्सव चालतो. या सहा दिवसात शेजारती नसते. पाचशे आरत्यांची आवर्तने होतात. पंचमीस गोपाळकाला होतो. माघ कृष्ण १३ म्हणजे महाशिवरात्री. रात्रौ स्वारीला अभिषेक महापूजा होऊन उशिरा पालखी निघते. रात्री दोन वाजता द्वार बंद होते. हा शेवटचा सांवत्सरिक उत्सव!

आद्य पुजारी भैरंभटाचे वंशज, दररोज काकडआरती ते शेजारती आणि पाडवा ते महाशिवरात्र सगळे कार्यक्रम अत्यंत उत्साहाने साजरे करतात. यामध्ये यत्किंचितही बदल अथवा हलगर्जीपणा नसतो. त्यातूनही काही अपराध घडला असल्यास त्याचे निराकरण व्हावे म्हणून काकड आरतीच्या वेळी 'क्षमस्वापराधंम्' आणि शेजारतीचे आधी 'अपराध क्षमा आता केला पाहिजे' अशी विनवणी देवाला करतात. या लाडक्या लेकरांच्यावर महाराज प्रसन्न आहेत. भक्तजनावर अनुग्रह करणे किंवा त्यांना काही सूचना द्यायच्या असतील किंवा कांही सांगायचे असले तरी एखाद्या पुजाऱ्याच्या मुखातून श्रीदत्तमहाराज बोलत असतात. याचा मला अनुभव आहे. श्रीमन्नारायणस्वामींच्या मठाची स्वच्छता, चांदीची उपकरणे स्वच्छ करणे, स्वारीच्या पोशाखाची तयारी करणे किंवा पावसाळ्यात पाणी उतरून गेल्यावर श्रींच्या पादुकांना मिरपूड लावणे अशी कितीतरी कामे पुजाऱ्यांच्या मुखातून आज्ञा देऊन महाराजांनी माझ्याकडून करून घेतली. देवस्थानाच्या हिशेब लेखनाचे काम असेच झाले. दत्तमहाराजांची ही लाडकी लेकरे मला दत्तप्रभूच वाटतात. त्यांच्या करवी केलेले कोणतेही धर्मकृत्य किंवा पूजासेवा याचे श्रध्दावंत भक्ताला फळ नक्की मिळते. गेल्या १९-२० पिढ्या ही मंडळी अहर्निश दत्तसेवाच करतात.

धन्य ते भैरंभट जेरे आणि धन्य त्यांचे वंशज! पुढचा जन्म मिळाला तर पुजारी कुळात मिळावा आणि माझ्याकडून महाराजांनी सेवा करून घ्यावी ही प्रार्थना करून हा लेख संपवितो.

◆◆◆

# ।। अथ श्रीएकवीरास्तोत्रम् ।।

ॐनमोजी गजरुपधारा। सरस्वती, ब्रह्मकुमरा ।
मूर्तब्रह्म गुरुवरा। मज द्यावे कृपाबाळ ।।१।।
जमदग्नी महामुनी। तयाची प्रियकामिनी।
मातापुरवासिनी। जगदंबा एकवीरा ।।२।।
रेणुकनृपसुता। सकळसद्‌गुणयुता।
गाती तिची गुणगाथा। दशदिशा प्रेमभरे ।।३।।
यथाकाळी कन्यादान। रेणुकनृप करी जाण।
जमदग्नी तपोधन। कन्या दिधली तयासी ।।४।।
ऋषी करी तपाचरण। सती अनुकूलवर्तन।
करीत असता एकदिन। विपरीतरूपे ठाकला ।।५।।
जल आणण्या सरिती। जाय रेणुकासती।
येथे जळक्रीडा करिति। राजा-राजपरिवार ।।६।।
देखून श्रृंगारक्रीडन क्षणएक परते जाण।
पति तोचि महाविघ्न। सर्व येई तियेच्या ।।७।।
देखता तिसी सागोरी। जमदग्नी कोपेभारी।
म्हणे, 'सुता, इसी मारी'। जो न मारी, तो मेरे।' ।।८।।
तीन पुत्र ऐसे गेले। रामे पितृवचन केले।
मातेसी स्वहस्ते वधिले। उःशापाने जीववी ।।९।।
वर्तता ऐसे एके दिनी। सहस्त्रार्जुनसुतांनी।
वधिला जमदग्नीमुनी। सहगमन करी जाया ।।१०।।
मातापुर गिरीवर दत्तात्रेय गुरुवर।
करी अत्यंसंस्कार। शोकग्रस्त राम होई ।।११।।
आठवून रेणुकामाता। दुःख करी अत्यंता।
प्रगटे तत्समीपता। आगळा रूप सगुण ।।१२।।
ते देखोन नुरे दुःख। मातादर्शनी वाहे सुख।
एकवीरा नामे देख। ख्यात आत्मजसामर्थ्ये ।।१३।।
जगदंबेचिये काज। करवीरी येई सहज।
सन्निध वसे अत्रिज। दत्तात्रेय भिक्षुक ।।१४।।
ऐसी पूर्वजादेवी। ध्याताप्रेमे मनोभावी।
अखंड वात्सल्य भरवी। मातृरूपे सर्वदा ।।१५।।
ऐसे तुज स्तविता। नवदुर्गे जगन्माता ।
नवरात्री नवदुर्गा यात्रा। सुफळ व्हावी संपुर्ण ।।१६।।
इति श्रीएकवीरास्तोत्रम् ।।







।। श्री गंगा माता।।

# स्वागत कन्यागत पर्वाचे



।। श्री कृष्णावेणी माता।।

श्री. द. बा. पुजारी

भक्तास्तव करुणानिधी श्री भू प्रगटला ।
पर्वत द्विभाग करूनि स्वयंभू शोभला ।।
सुरवर भक्ता सर्वा स्वानंद झाला।
जयजयकार करूति नमिती पदकमला ।।१।।
जय देव जय देव जय जय नाईकबा ।
सांबा तू बा तारक भक्ता अविलंबा।।
अद्भुत महिमा तूझी महिवर परज्योती ।
सर्वही स्तविती ध्याती अर्चिती तूज प्रीती ।।
सुगंध पुष्पे वस्त्र नाना परिवाहती।
गुलाल बिल्वाक्षता परिमळ अर्पिती।।
जय देव जय देव जय जय नाईकबा।
सांबा तू बा तारक भक्ता अविलंबा।।
नाना ताटी अन्ने अपूप समवेत।
नैवेद्य तांबूल अर्पिती धूप दीप संयुक्त ।।
कर्पूर सुपंचारती करुनि हर्षाक्त।
पुष्पांजली वाहुनि वंदी गुरु भक्त ।।
जय देव जय देव जय जय नाईकबा।
सांबा तू बा तारक भक्ता अविलंबा ।।



।। श्री गंगा माता।।

# स्वागत कन्यागत पर्वाचे



।। श्री कृष्णावेणी माता।।

**श्री. श्रीपाद दिगंबर पुजारी**

श्री नृसिंहसरस्वती स्वामी महाराज तीर्थाटन करीत औदुंबरक्षेत्री आले. भुवनेश्वरी देवीच्या सन्निधी कृष्णा नदीच्या पैलतीरावर त्यांनी चातुर्मास व्यतीत केला. तेथून ते वारणासंगमी आले. तसेच पुढे कृष्णातटाकावरून तीर्थाटन करीत कृष्णा - पंचगंगा संगमी आले. कृष्णा, वेण्णा, शिवा, भद्रा, भोगावती, कुंभी आणि सरस्वती असा हा सप्त नद्यांचा संगम. कृष्णेच्या पूर्व तीरावर अमरापूर (सध्याचे औरवाड) गाव व येथील श्री अमरेश्वराचे पवित्र क्षेत्र स्थान. त्याच्या बाजूलाच चौसष्ट योगिनींचा वास. कृष्णा नदीच्या काठावर शुक्लतीर्थ, सिध्दतीर्थ, पापविनाशी तीर्थ अशी आठ तीर्थे. साक्षात तपोभूमी. श्री स्वामी महाराजांचे मन प्रसन्न झाले. त्यांनी कृष्णेच्या पश्चिम तीरावर असलेल्या एका विशाल औदुंबर वृक्षाखाली तप:साधना करणेचे ठरवले व येथे त्यांचे मन इतके गुंतून गेले कीं, त्यांनी एक तप या ठिकाणी वास्तव्य केले. तेच हे ठिकाण म्हणजे आजची नृसिंहवाडी (नरसोबावाडी) होय.

**पुढे कृष्णा तटाकांतु। श्री गुरु तीर्थे पावन करितु।**
**पंचगंगासंगम ख्यातु। तेथे राहिले द्वादशाब्दें ।।**

संगमी स्नान, जप, तप:साधना असा श्रीगुरुंचा दिनक्रम असे. भिक्षा मागण्यासाठी ते कधी कधी पैलतीरावरच्या अमरापूर गावी जात इतकेच. ती सुध्दा सामान्य पण भाव-भक्ति असलेल्या सत्शील द्विजागृहीच. हे यती बाहेर कोठे जाताना दिसत नाहीत मग त्यांचा नित्य योगक्षेम कसा चालतो, हा बाजूच्या गावांतील लोकांना संभ्रम होता. त्यांनी एक दिवस एका ब्राह्मणास या यतीच्या दिनक्रमावर नजर ठेवण्यास नियुक्त केले. पण दुपार होताच त्या ब्राह्मणाचे अंत:करण भयभीत झाले. भीतीने बोबडी वळली व तो तेथून पळून गेला. जो अवतारी योगी जगाचा योगक्षेम चालवत होता त्यांच्या विषयी कुशंका घेणे म्हणजे आत्मघात हे सामान्य लोकांना कसे कळणार? श्रद्धा, निष्ठा, भाव, भक्ती असल्याशिवाय श्रीगुरूंना ओळखणे केवळ अशक्य!

स्वामी महाराजांच्या या तपोभूमी परिसरात गंगानुज नावाचा एक मनुष्य शेती करत असे. त्याने एक दिवस पाहिले की दुपारच्या वेळी चौसष्ट योगिनी औदुंबरापाशी आल्या व श्रीगुरुंना नमस्कार करून त्यांना पैलतीरावर घेऊन गेल्या. कृष्णेच्या पात्राजवळ जाताच ते पात्र दुभंगले, प्रवाह स्थिर झाला आणि त्या निर्माण झालेल्या वाटेने श्रीगुरु चौसष्ट योगिनींसमवेत पैलतिरावर गेले. गंगानुज या लीलेमुळे आश्चर्यचकित झाला. त्याचे कुतूहल जागे झाले. दुसरे दिवशी योगिनी श्रीगुरुंना नेण्यासाठी आल्या तेव्हा सहज आश्चर्यापोटी तोही त्यांच्यामागे निघाला. दुभंगलेल्या प्रवाहाचे वाटेने तो पैलतिरावर गेला. तेथे अमरावतीसारखी नयनरम्य नगरी त्याने पाहिली. रत्नजडीत सिंहासनावर श्रीगुरूंना बसवून

त्या चौसष्ट योगिनींनी त्यांची विधिपूर्वक पूजा केली. त्यांना भोजन वाढले. श्रीगुरूंचे लक्ष त्यावेळी गंगानुजाकडे गेले. त्यांनी गंगानुजाला येथे येण्याचे प्रयोजन विचारले. गंगानुजाने श्रीगुरुंना दंडवत घातले व म्हणाला, "मी सहज आपल्या दर्शनासाठी आलो. कुतूहलाशिवाय माझ्या मनांत अन्य कोणतीही भावना नाही. मला क्षमा करा. माझा उद्धार करा." श्रीगुरूंनी त्याची भावना ओळखली. प्रसन्न वदनाने त्याला अभय देऊन आशीर्वाद दिला की, "आजपासून तुझे दैन्य नष्ट होऊन तुझ्या मनीच्या सर्व आकांक्षा पूर्ण होतील. पण आज जे काही तू पाहिलेस त्याची कोठेही वाच्यता करू नकोस. ज्यावेळी तू हा प्रसंग उघड करशील त्यावेळी तुझे आयुष्य संपेल." गंगानुजाला घेऊन श्रीगुरु प्रवाहाबाहेर आले. गंगानुज श्रीगुरुंचा निस्सीम भक्त झाला. त्यांची नित्य सेवा करू लागला. त्याचे दारिद्र्य नष्ट झाले.

सेवा करीत असतांना गंगानुजाने श्रीगुरूंना विचारले कीं, "प्रयागाला माघस्नान केल्याने खूप पुण्य प्राप्त होते असे ऐकले आहे. मला काशी, गया, प्रयाग या त्रिस्थळाबद्दल काहीच माहिती नाही. तेव्हा या सेवकाला या तीर्थक्षेत्रासंबंधीची माहिती सांगाल का?" श्रीगुरू स्मित वदनाने म्हणाले, "अरे त्रिस्थळी तर याच ठिकाणी आहे. लांबवर कशाला जायला पाहिजे. हे गुरुस्थळ म्हणजे काशीच आहे. कृष्णा - पंचगंगा संगम हा प्रयागासमान आहे. कोल्हापूर हे दक्षिण प्रयागच आहे. त्रिस्थळीला मिळणारे सर्व पुण्य भक्तांना या ठिकाणी सुद्धा प्राप्त होईल."

**श्रीगुरु म्हणती तयासी । पंचगंगा संगमेसी ।।**
**प्रयाग जाणावें भरंवसी । काशीपुर ते जुगुळ ।।**
**दक्षिण प्रयाग कोल्हापूर । त्रिस्थळी असे मनोहर ।।**
**जरी पाहसी प्रत्यक्षाकार । दावीन तुज चाल आता ।।**

गंगानुजाची जिज्ञासा जाणून श्रीगुरूंनी त्याला प्रत्यक्ष त्रिस्थळीचे दर्शन घडवून आणतो, असे सांगितले. माझ्या व्याघ्राजिनाला घट्ट धरून ठेव व नेत्र झाकून घे. असे सांगून श्रीगुरू मनोवेगे प्रात:काळी प्रयागाला गेले. तेथे त्यांनी गंगानुजाला संगमात स्नान करून येणेस सांगितले. माध्यान्ही त्याला काशीस नेऊन श्री विश्वेश्वराचे दर्शन घडवले. नंतर गयेला जाऊन त्रिस्थळीची यात्रा पूर्ण करून सायंकाळी कृष्णा-पंचगंगा संगमी परत आले. गंगानुजाचे हे महत भाग्यच म्हणावयास हवे की त्याला दत्तावतार श्री नृसिंहसरस्वती स्वामी महाराजांची सेवा करण्याचे भाग्य लाभले. त्यांच्या चरणांसी तद्रुप होऊन त्रिस्थळीचे दर्शन घेता आले. तसेच कृष्णा-पंचगंगा संगमावरील ही तपोभूमी (श्री क्षेत्र नृसिंहवाडी) ही साक्षात त्रिस्थळीचे पुण्य देणारी असल्याचे भक्त, जन कल्याणार्थ विशद केले.

या पावन क्षेत्री श्रीगुरुंनी बारा वर्षे तप:साधना केली. येथील भूमीचा कण-न-कण स्वामी महाराजांच्या चरण स्पर्शाने पुनित झाला. कृष्णातीर तीर्थमय झाला. वेदघोषानें आसमंत पवित्र झाला. भक्तिभावाने श्रीगुरूंच्या दर्शनास येणाऱ्यांची दैन्य, दु:खे निवारण झाली.

गुरुकृपेविषयी अमरापूरच्या कुलकर्णी नामक द्विजाची कथा वानगीदाखल सांगावीशी वाटते. हा सदाचारी, सत्शील ब्राह्मण पूर्वतीरावरील अमरापूर येथे भिक्षुकीचा व्यवसाय करून आपल्या कुटुंबासह राहात असे. भिक्षुकी करून शिधा मिळे त्यावर त्या कुटुंबाची दैनंदिन गुजराण होत असे. त्यांच्या अंगणात एक घेवड्याचा वेल होता. जर एखाद्या दिवशी शिधा मिळाला नाही तर या वेलाच्या घेवड्याच्या शेंगावर त्या कुटुंबाचा उदरनिर्वाह होत असे. एक दिवस श्रीगुरु या ब्राह्मणाचे घरी भिक्षेसाठी गेले. त्या द्विज दाम्पत्याला खूप आनंद झाला. त्यांनी त्यांचे यथोचित स्वागत केले. स्वामी महाराजांनीही त्यांचे घरी प्रसन्न अंत:करणाने भोजन ग्रहण केले. भोजन करून बाहेर आल्यावर श्रीगुरूंनी जाताना घेवड्याचा वेल

उपटून टाकला व स्वस्थानी आले. त्या ब्राह्मणाच्या कुटुंबातील पत्नी व मुलाबाळांना खूप दु:ख झाले. "आम्ही या स्वामी महाराजांची मनोभावे सेवा केली. परंतु जाताना त्यांनी आमच्या मुखीचाच घास हिरावून घेतला. जर काही शिक्षा मिळाला नाही तर या वेलाच्या शेंगाच आमची उदरपूर्ती करत असत. आता तुम्ही काय करावे!" असे म्हणून ती विलाप करु लागली. पण तो ब्राह्मण विचारी होता. त्याने आपल्या पत्नीची समजूत घातली की, 'जेव्हा विधात्याने ही जीवसृष्टी निर्माण केली तेव्हाच त्यांच्या उदर-भरणाची सोयही त्याने निश्चित केलेली आहे. तेव्हा आपण काळजी करणेचे कारण नाही. श्रीगुरूंच्या मनींचे जाणण्यास आपण असमर्थ आहोत. कदाचित आपल्या भल्यासाठीच त्यांनी हा वेल तोडला असेल. योगीपुरुष आपले तारणहारच असतात. त्याकरताच ते आपल्या घरी भिक्षेस आले. तेंव्हा त्यांना वृथा बोल लावू नको.' इतके सांगून त्या द्विजाने छाटलेला वेल गंगेत टाकून दिला. वेलाचे मूळही काढून टाकावे म्हणून तेथील जमीन खोदत असता त्याला वेलाचे मुळाशी धनाने भरलेला हंडा (कुंभ) आढळला. श्रीगुरुकृपेने आपणाला धनलाभ झाला, आपले दारिद्र्य दूर झाले हे जाणून ते दांपत्य आनंदीत होऊन श्रीगुरूंचे दर्शनास गेले. त्यांना आशीर्वाद देऊन श्रीगुरू म्हणाले, "तुमचे दारिद्र्य दूर झाले आहे. पुत्र पौत्रासह तुम्ही सुखाने राहा. पण ही घटना प्रकट करू नका. नाहीतर ही लक्ष्मी घरातून निघून जाईल."

ज्यावर गुरुकृपा होते, त्यांचे दैन्य, दु:ख नेहमीच निवारण होते. पण त्याकरता भक्तापाशीं भाव, भक्ती, निष्ठा असली पाहिजे.

**भक्तिने भजता गुरुचरण होईल पाप दैन्य हरण।**
**मिळेल धन कीर्ती जगती अंति खचित मोक्ष प्राप्ती ।।**

बारा वर्षांच्या तप:साधनेनंतर श्रीगुरू नृसिंहवाडीहून गाणगापूरास जाण्यास निघाले. चौसष्ट योगिनींसह साऱ्याच भक्तगणांस अपार दु:ख झाले. चौसष्ट योगिनी म्हणाल्या, "श्रीगुरुदेव आम्हास सोडून का जाता? आपल्या नित्य दर्शनाने आम्हा सर्वांची दु:खे हलकी होतात. आपण येथून गेल्यास आम्हास आता कोण?" श्रीगुरू म्हणाले, "लौकिकार्थी मी येथून जात असलो तरी गुप्तरूपाने माझा वास येथेच असेल. या कल्पवृक्ष औदुंबर तळवटी मी माझ्या पादुका ठेवून जात आहे. औदुंबरासहित या पादुकांची जे मनोभावे सेवा करतील, त्यांच्या मनोकामना पूर्ण होतील. वांझ स्त्रियांस पुत्र प्राप्ती होईल. औदुंबराखाली अकरावेळा रुद्र पठण केल्यास अतिरुद्र केल्याचे फळ मिळेल. मंदगतीने प्रदक्षिणा केल्यास अनंत पुण्याची प्राप्ती होईल. रुग्णांना आरोग्य लाभेल. गुप्त रुपाने मी येथेच असेन. आपण मनात संशय धरू नका."

**होईल महाक्षेत्र भूवरी दर्शने पापे होतिल दुरी।**
**पूजिता भावे भक्तिसी पाविजे सुख समृध्दीसी ।।**

लौकिकार्थाने श्रीगुरुंनी गाणगापुराकडे प्रस्थान केले तरी गुप्त रुपानें ते औदुंबरातळवटी (वाडीक्षेत्री) असल्याची प्रचिती भाविकांना येत राहिली.

कृष्णा पंचगंगा संगमापासून चार मैलावर शिरोळ नावाचे नाव आहे. तेथे गंगाधर नावाचे एक वेदशास्त्र संपन्न ब्राह्मण राहात होते. त्यांची पत्नी सुशील व पतिव्रता होती. दैववशात या दंपतीची मुले जगत नसत. त्यांना पाच पुत्र झाले. परंतु सर्व मृत्यू पावले. परद्रव्य हरण, अश्ववध किंवा गर्भपात केल्यामुळे संतती जगत नाही, असे शास्त्र सांगते. तेथील ब्रह्मवृंदांनी तिला तिच्या पूर्वजन्मीचा वृत्तांत कथन केला. तिने शौनक गोत्रातील एका ब्राह्मणाकडून शंभर रुपये ऋण घेतले

होते. तो ब्राह्मण धनाचा लोभी होता. त्याने पैसे परत करण्यासाठी तुझ्याकडे बरीच विनवणी केली, परंतु परिस्थितीमुळे तुला ते द्रव्य परत करता आले नाही. आपले पैसे बुडाले या भावनेने त्या ब्राह्मणाने आत्महत्या केली. त्याच्या मृत्यूनंतर तुम्ही त्याचे धर्मसंस्कारही केले नाहीत. त्यामुळे तो पिशाच्च झाला असून सूडबुध्दीने या जन्मी तुझ्या संततीचा नाश करतो. तो तुम्हाला असाच त्रास देत राहणार. यास्तव तुम्ही त्याचे उत्तरक्रियाकर्म करून शौनक गोत्रातील एका ब्राह्मणाला शंभर रूपये दान द्यावेत. तसेच कृष्णा - पंचगंगा संगमी राहून एक महिना उपवास करावा. रोज संगमी स्नान करून औदुंबर वृक्षाची व त्याखाली स्थापन केलेल्या श्री नृसिंहसरस्वती स्वामी महाराजांच्या पादुकांची पूजा करावी. त्यांचे कृपेने या पिशाच्यापासून तुम्हांस मुक्ती मिळेल. गुरुकृपेने तुमच्या सर्व इच्छा पूर्ण होतील. त्या ब्राह्मणस्त्रीने दान देण्यास इतके द्रव्य आपलेजवळ नसल्याचे सांगितले. तेव्हा ब्रह्मवृंदांनी सांगितले कीं संगमी जाऊन निर्मळ मनाने तुम्ही औदुंबर व पादुकांची सेवा करा. श्री नृसिंहसरस्वती स्वामी महाराजांचा निरंतर वास तेथे आहे. तुमच्या सेवेमुळे श्रीगुरू नक्कीच प्रसन्न होतील. तुमच्या मनोकामना पूर्ण करतील.

मनी विश्वासाची खूणगाठ बांधून ती द्विज स्त्री लागलीच कृष्णा-पंचगंगा संगमी गेली. तीन दिवस अत्यंत भक्तिभावाने श्रीपादुकांची व औदुंबराची सेवा करीत राहिली. सातवेळा संगमी स्नान करून ती विधियुक्त श्री पादुकांची पूजा व औदुंबराला प्रदक्षिणा घालीत असे. तिसऱ्या दिवशी तिच्या स्वप्नात तो पिशाच्चरुपी शौनकगोत्री ब्राह्मण आला व अजून तू माझे ऋण फेडले नाहीस, तुझा वंश वाढू देणार नाही, तुझा नाश करीन, असे म्हणत तिला मारावयास आला. ती स्त्री भिऊन औदुंबर वृक्षामागे आली. तिथे तिने श्रीगुरूंना पाहिले. श्रीगुरूंनी त्या स्त्रीस अभय दिले व पिशाच्चास विचारले की, "तू या स्त्रीस का त्रास देतो आहेस?" पिशाच्च म्हणाले, "गतजन्मी हिने माझेकडून ऋण घेतले ते परत केले नाही म्हणून मी आत्महत्या केली. आपन कृपाळू आहात. आपण पक्षपात करू नका." श्रीगुरु म्हणाले, "माझ्या भक्ताला त्रास देऊ नको. मी सांगेन तसे कर म्हणजे तू पिशाच्च योनीतून मुक्त होशील व तुला सद्‌गती मिळेल." पिशाच्चरूपी ब्राह्मणाने ते मान्य करून आपणास सद्‌गती द्या, अशी श्रीगुरूंपाशी प्रार्थना केली.

श्रीगुरूंनी त्या स्त्रीस तिजजवळ जितके द्रव्य असेल ते शौनकगोत्री ब्राह्मणाला अर्पण करून दहा दिवस त्या पिशाच्चरुपी ब्राह्मणाचे उत्तरकार्य करणेस सांगितले. यामुळें तिला गतजन्मीच्या पापातून मुक्ती मिळेल व पिशाच्चालाही सद्‌गती मिळेल असे सांगितले. तसेच सात दिवस अष्टतीर्थी स्नान करून औदुंबराची मनोभावे सेवा केल्यास तिला शतायुषी पुत्र होतील, असा आशीर्वादही दिला.

ब्राह्मण स्त्री स्वप्नातून जागी झाली. मनी खूणगाठ बांधून तिनें श्रीगुरुंच्या दृष्टांताप्रमाणे सर्व क्रियाकर्म केले, शेवटच्या दिवशी श्रीगुरु तिच्या स्वप्नात आले व दोन श्रीफलांनी तिची ओटी भरली. दोन शतायुषी पुत्रांची माता होशील असा आशीर्वाद दिला.

कालांतराने या दाम्पत्याला दोन मुले झाली. गुरुसेवेचे फळ आपल्याला मिळाले म्हणून त्यांना खूप आनंद झाला. मोठ्या मुलाची मुंज झाली. पण अनुजाच्या चौलकर्म वेळी धनुर्वातासारखी दुर्धर व्याधी त्याला जडली. त्यात त्याचा मृत्यू झाला. ब्राह्मणस्त्रीला अनावर दु:ख झाले. मुलाचे गुण आठवत ती विलाप करु लागली. श्रीगुरूंचा मला आशीर्वाद होता की दोन शतायुषी पुत्र होतील. मग हा माझा मुलगा आम्हाला अल्पायुष्यातच कसा सोडून गेला. असे म्हणत मुलाचे प्रेत मांडीवर घेऊन आक्रोश करीत राहिली. लोक नानाप्रकारे तिची समजूत घालत होते. मृत्यू हा देव, दानव, ऋषी, मुनीनाही चुकलेला नाही. जे ललाटी लिहिलेले असते तसे घडते. तेव्हा वृथा शोक करु नको असे परोपरीने समजावीत होते. पण

त्या ब्राह्मण स्त्रीचा शोक थाबंत नव्हता. श्रीगुरु नृसिंह सरस्वती स्वामी महाराजांचे आशीर्वादाने मला पुत्र झाले. ते शतायुषी होतील हे त्यांचे बोल खोटे कसे ठरतील? श्रीगुरु दत्तावतार आहेत. मग ते माझा घात कसा करतील? तसे झाले तर त्यांच्या बोलावर कोण विश्र्वास ठेवील? असे म्हणत ती अधिकच आक्रोश करीत राहिली.

लोक अंत्यसंस्कारासाठी प्रेताची मागणी करु लागले; पण ती ते देईना. माझ्यासह प्रेताचे दहन करा असे सांगू लागली. इतक्यात तिथे एक ब्रह्मचारी आला व तिला ज्ञानाच्या गोष्टी सांगू लागला.

ब्रह्मचारी म्हणाला, "या भूतलावर कोणी चिरंजीवी नाही. पाण्यात बुडबुडा येतो व क्षणभराने फुटतो तसे या भूतलावरचे आयुष्य असते. फक्त मायेमुळे माझा देह, माझी मुले वगैरे आपण म्हणतो. पण या जगात काहीही स्थिर नाही. मानवी देह पंचमहाभूतांचा बनलेला आहे. सत्व, रज, तम ही पंचमहाभूतांची लक्षणे आहेत. त्या त्या गुणांप्रमाणे कर्म घडते व त्याप्रमाणेच त्याची फळे मिळतात. कोणाचे आयुष्य कमी तर कोणाचे जास्त असते. तुझेच किती जन्म झाले ते सांग! मनुष्य योनीत तुझे जन्म झाले असतील तर त्यावेळी तुझे माता-पिता कोण होते? तू कोणाची गृहिणी होतीस? चर्म, मांस व मज्जा या समूहाचे हे शरीर बनलेले आहे. हे सगळे अस्थिर व नाशवंत आहे, तुम्ही भ्रमाने वृथा शोक करीत आहात. तेव्हा मायेचा त्याग करून हे प्रेत संस्कारासाठी द्या."

ती स्त्री म्हणाली, "तुम्ही मला धर्म सांगितलात खरे; पण माझे अंत:करण स्थिर नाही. आम्ही दैवहीन आहोत. परंतु मी श्री नृसिंह सरस्वती स्वामी महाराजांच्या पादुकांची मनोभावे सेवा केली आहे. त्यांनी मला अभय व शतायुषी पुत्र होतील म्हणून वरदान दिले आहे. मी त्यांचेवर विश्र्वास केला आहे. त्यांचे वचन खोटे कसे होईल! तेव्हा हा देह मी गुरुस्थानाला जाऊन तेथे अर्पण करीन."

ब्रह्मचारी म्हणाला, "जर श्रीगुरुंच्यावर तुझा इतका विश्र्वास असेल तर ज्या ठिकाणी तुला हा वर मिळाला त्या कृष्णा - पंचगंगा संगमावरील औदुंबर वृक्षाखालील पादुकांजवळ मुलाचे प्रेत ठेव."

ब्रह्मचाऱ्याचे बोल ऐकून तिच्या मनी विश्र्वास निर्माण झाला. प्रेत पोटाला बांधून पतीसह ती कृष्णा पंचगंगा संगमी श्रीपादुकांच्या जवळ आली. गुरुपादुकांवर डोके टेकून आक्रोश करु लागली. पुत्रशोक हा सर्वाधिक असतोच. अस्तमानाचे वेळी ग्रामस्थ येऊन दहन करण्यासाठी प्रेत मागू लागले. पण काही केल्या ती स्त्री मुलाचे प्रेत देईना. आपल्यासह प्रेत दहन करा म्हणून पादुकांवर लोळण घेऊ लागली. आलेले लोक या प्रकारानें हतबुध्द झाले. रात्री प्रेताला दुर्गंधी सुटेल व मग आपोआपच ती प्रेत संस्कारावयाला देईल असे ठरवून ते स्वस्थानी परत गेले. फक्त दंपती प्रेतापाशी राहिली. अतिश्रमाने व जागरणाने रात्री तीन प्रहरी त्यांना झोप लागली.

त्या स्त्रीला स्वप्नात श्रीगुरु औदुंबर वृक्षातळी दिसले. तेज:पुंज भस्मांकित तनु, रुद्राक्षमाला धारण केलेले असे त्यांचे रुप होते. त्यांच्या हाती योगदंड व त्रिशूल होते. "आम्हास वृथा दोष का देता? बघू तुमच्या पुत्रास काय झाले आहे ते." असे म्हणून ते त्या मृत पुत्राजवळ गेले. आपल्या जवळील भस्म काढून त्या मुलाच्या सर्व देहावर लावले. त्याचे मुख उघडायला लावून आत प्राणवायू घातला.

हे स्वप्न पाहून ती ब्राह्मणस्त्री भयभीत होऊन उठली. तिने आपल्या पुत्राकडे पाहिले. त्याच्यात चेतना येत असल्याचे तिला दिसले. गार पडलेले शरीर उष्ण होऊ लागले होते. तिला भीती वाटली की हे पिशाच्च तरी नसेल! पण इतक्यात तिचा पुत्र उठून बसला. भूक लागली. खायला दे म्हणून रडू लागला. मायेने तिने त्याला पोटाशी धरले. स्तनपान करवले. मुलाला घेऊन ती पतीपाशी गेली. त्यांना जागे करून घडलेला सर्व वृत्तांत सांगितला. त्या सत्शील ब्राह्मणाचे ध्यानी सर्व

प्रकार आला. ही सर्व स्वामी महाराजांची कृपा होय, त्यांची लीला अगाध आहे, असे म्हणून त्यांनी श्रीचरणावर लोळण घेतली. औदुंबराला नमस्कार करून प्रदक्षिणा घातल्या. श्रीगुरूंची नानाप्रकारे स्तुती केली. त्यांचा जयजयकार केला. आपण भक्तकल्याणासाठी मानव देही अवतार घेतलात, आमच्याकडून काही अपराध घडला असल्यास क्षमा करा असे म्हणून लोटांगण घातले. तिघांनीही संगमात स्नान करून गुरुपादुका धुतल्या. भावभक्तीने विधीपूर्वक पादुकांची पूजा केली. क्षमायाचना केली. इतके होईतो प्रात:काल झाला.

प्रेताचे दहन करण्यासाठी ग्रामवासी तेथे आले आणि त्या मृत पुत्राला जिवंत पाहून विस्मयचकित झाले. गुरुलीला अगाध आहे म्हणून सर्वांनी स्वामी महाराजांचा जयजयकार केला.

**त्रयमूर्तीचा अवतारु । नृसिंह सरस्वती असे गुरु ।**
**तेणे दिधला असे वरु । केवीं असत्य होय सांगे ।।**

कृष्णा - पंचगंगा संगमी, औदुंबर वृक्षातळवटी, मनोहर पादुकांचे रुपाने श्रीगुरु श्री नृसिंह सरस्वती स्वामी महाराजांचा नित्यवास वाडीक्षेत्री आहे. भावभक्तीने गुरुचरणांची आराधना केल्यास भक्तांच्या मनोकामना फलद्रुप होतील, वांझेस अपत्य प्राप्ती होईल, दुर्धर रोगांचा परिहार होईल, मंदमतींना ज्ञान प्राप्त होईल, बधीर, मुका, पांगळा, रक्ती यांचे सुदेहात रूपांतर होईल आणि दैन्य दु:ख यांचे निवारण होईल.

**राजधानी वाडी क्षेत्री सद्‌गुरु यतींची ।**
**धरा भाव भक्ति निष्ठा गुरुपादुकांची ।**
**कलियुगी कल्पवृक्ष स्थान अमृताचे ।।**

**।। श्रीगुरुदेव दत्त ।।**

◆ ◆ ◆

## सुविचार मौक्तिके

- **विष्णूमंदिरास चार वेळा, शंकरास अर्धी, देवीच्या मंदिरास एकदा, सूर्यमंदिरास सात वेळा व गणपतीस तीनच प्रदक्षिणा कराव्यात.**
- **देवाच्या उजव्या बाजूस तुपाचा दिवा व डाव्या बाजूस तेलाचा दिवा ठेवावा.**
- **श्राध्दाचे वेळी जर अतिथी आला तर त्याचे स्वागत करावे.**